AC –20/04/2024
Item No. – 5.4 (N) Sem I (1a)

# As Per NEP 2020

I

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for Basket of OE** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **I** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **I) मराठी चित्रपटगीतांचा अभ्यास** | **2** |
| **II)** | |
| **III)** | |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | Description the course:<br><br>Including but Not limited to : | **मराठी चित्रपटगीतांचा अभ्यास**<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक संरचनेच्या अंतर्गत अभ्यासक्रमाचे स्वरूप बहुविद्याशाखीय (Multi-Disciplinary) आहे. त्यामुळे पदवीस्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या मुख्य विषयाची (Major course) विद्याशाखा सोडून अन्य विद्याशाखेतील कोणत्याही विषयांचा अभ्यास मुक्त वैकल्पिक म्हणजे Open Elective (OE) या स्तंभांतर्गत करणे अनिवार्य आहे. पदवीस्तरावर प्रथम व द्वितीय अशा दोन वर्षांत प्रत्येकी दोन श्रेयांकनाच्या अभ्यासपत्रिका निवडून या स्तंभांतर्गत १० - १२ श्रेयांकने प्राप्त करणे आवश्यक आहे. पदवी स्तरावर वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी कला व मानव्यविद्या शाखेतील मराठी हा विषय अन्य विद्याशाखीय विषय ठरतो. हे विद्यार्थी प्रस्तुत अभ्यासपत्रिका OE स्तंभांतर्गत निवडू शकतात.<br>चित्रपट व चित्रपटातील गीते आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग आहेत. सर्वसामान्य माणसांचे जीवन चित्रपटांतील लोकप्रिय गीतांच्या संदर्भाशिवाय अपूर्ण आहे. किंबहुना 'भारतीय लोकप्रिय संस्कृतीचे' चित्रपटसंगीत व त्यातील गीतरचना हे महत्त्वाचे अंग आहे. समाजातील विविध आकांक्षांचे, भावभावनांचे प्रतिबिंब चित्रपटगीतांतून दिसते. दु:ख, प्रेम, आनंद, समूहभावना तसेच व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील विविध ताणतणाव, बदलते मूल्यसंघर्ष, नातेसंबंध यांना चित्रपटगीते एक वाङ्मयीन अभिव्यक्ती म्हणून आकार देतात. त्यामुळेच ते लोकरंजनाचे महत्त्वाचे माध्यम ठरते.<br>चित्रपटगीताच्या अभ्यासात संगीत व चित्रपटसंबंधित (ध्वनिचित्रमुद्रण, छायाचित्रण इ.) अंगांचाही समावेश होत असला तरिही प्रस्तुत अभ्यासक्रम भाषा व साहित्याभ्यासाच्या परिप्रेक्षातून होत असल्याने त्याचा विचार येथे अभिप्रेत नाही. चित्रपटगीत हा एक महत्त्वाचा काव्यप्रकार व साहित्यप्रकार म्हणून त्याचा वाङ्मयीन दृष्टिकोणातून विचार करणे इथे अभिप्रेत आहे.<br>भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय मराठी भाषेला मिळाले आहे. मराठी सिनेमाला १०० हून अधिक वर्षांचा इतिहास आहे. चित्रपटात गीतांचा समावेश कशा प्रकारे करावा यासंबंधीचे प्रयोग, त्याबद्दलचे संकेत रूढ करण्यात मराठी सिनेमाची मोठीच भूमिका आहे. चित्रपटाचे कवितेशी नाते जोडणारा हा पूल मराठी सिनेमानेच विशेषकरून विकसित केला आहे. पुढे त्याचा भारतीय पातळीवरील विस्तार याच पार्श्वभूमीवर झाला आहे. नाट्यगीते, भावगीते, लोकगीते या गीतप्रकारांतून |

| | | |
|---|---|---|
| | | चित्रपटगीताने आपली मूलद्रव्ये घेतली असली तरी त्याला खास त्याचा असा चेहरामोहराही प्राप्त झाला आहे. चरित्रपट, कौटुंबिक नाट्य दाखवणारा चित्रपट, सामाजिक वास्तवदर्शन करणारा चित्रपट, लावणीपट इत्यादी विविध चित्रपटप्रकारानुसार व चित्रपटातील विविध गरजांनुसार चित्रपटगीत या काव्यप्रकाराला वैविध्यही प्राप्त झाले आहे. त्यामुळे एक मोठे सांस्कृतिक घटित म्हणून चित्रपटगीताने जीवनाचा मोठा भाग व्यापला आहे. मराठी कवितेच्या आधुनिक परंपरेशी चित्रपटगीतांनी अर्थपूर्ण नाते जोडले आहे. त्यामुळेच हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो.<br>अकादमिक अभ्यासाने विशेषत: साहित्याभ्यासाने चित्रपटगीतांच्या वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांची चर्चा करणे, त्याच्या आस्वादाची पायाभरणी करणे, त्यांच्या लोकप्रियतेची मीमांसा करणे प्राय: टाळले आहे. त्यामुळेच हा विषय आजवर दुर्लक्षित राहिलेला व अभ्यासाची मागणी करणारा विषय आहे. वास्तविक, चित्रपटगीतांचा प्रेक्षक व श्रोतावर्ग हा कायमच खूप मोठ्या प्रमाणात असल्याने या अभ्यासाचे क्षेत्रही एकूणच व्यापक व सतत अनेकविध घडामोडींनी भरलेले आहे. कोणताही सर्वसामान्य व विशेषतज्ज्ञ दोहोंनाही यात रस असू शकतो. चित्रपटगीत हे एकीकडे 'काव्य' आहे, तसेच दुसरीकडे मनोरंजनाच्या गरजा भागवण्याच्या हेतूने निर्माण झालेले व्यावसायिक कौशल्यही आहे. कला आणि कारागिरी यांचा त्यात मिलाफ आहे. व्यावसायिकता आणि कला यांचा तोल आहे. त्यामुळेच या अभ्यासाला आंतरविद्याशाखीयतेचे परिमाण लाभले आहे. काव्यशास्त्र, छंदशास्त्र यांच्यासोबतच लोकप्रिय संस्कृती, संस्कृतीअभ्यास, समाजशास्त्र या ज्ञानशाखांतील मर्मदृष्टींचा या अभ्यासक्रमात उपयोग करणे अभिप्रेत आहे.<br>मराठीतील अनेक मान्यवर कवींनी चित्रपटगीत लेखन केले आहे. तसेच व्यावसायिक गीतलेखन करणाऱ्या गीतकारांना कवी म्हणून साहित्येतिहासात महत्त्वाचे स्थान लाभले आहे. चित्रपटगीतांवर आस्वादपर स्फुटलेखन, सदरलेखन इत्यादी साहित्य मराठीत मोठ्या प्रमाणात लिहिले गेले आहे. या अभ्यासात ते महत्त्वाचे संदर्भसाहित्य ठरणार आहे.<br>चित्रपटगीताचा एक 'काव्यप्रकार' म्हणून व एक 'कलाप्रकार' म्हणून विचार करणारे व तत्संबंधित आस्वाद, निर्मिती इत्यादी सर्जनशील कौशल्यांचा विकास करण्यास मदत करणारे, असे नवे अभ्यासक्षेत्र यानिमित्ताने खुले होणार आहे. दैनंदिन जगण्याशी थेट संबंधित असल्याने हा अभ्यास वेगवेगळ्या व्यावसायिक क्षेत्रांसाठीही - जॉब मार्केटसाठीही महत्त्वाचा ठरू शकतो. मनोरंजन-उद्योगाशी (एन्टरटेनमेंट इंडस्ट्री) संबंधित असल्याने या अभ्यासाला आपोआपच व्यावसायिक मूल्य प्राप्त झाले आहे. |
| **2** | **Vertical :** | Open Elective |
| **3** | **Type :** | Theory |

| | | |
|---|---|---|
| 4 | **Credit**: | 2 credits<br>( 1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |
| 7 | **Course Objectives**: उद्दिष्टे<br>१. चित्रपटगीताची संकल्पना स्पष्ट करणे.<br>२. चित्रपटगीताचा एक आधुनिक काव्यप्रकार म्हणून मराठीतील विकासक्रम व परंपरा यांचा परिचय करून घेणे.<br>३. चित्रपटगीतांच्या विविध उपप्रकारांचा व त्यांच्या भाषिक वैशिष्ट्यांचा परिचय करून घेणे.<br>४. चित्रपटगीताच्या सांगीतिक व चित्रपटकथासंबंधित अशा दोन्ही बाजूंचा परस्परसंबंध स्पष्ट करणे.<br>५. चित्रपटगीतलेखनाच्या व्यावसायिक बाजूचे स्पष्टीकरण करणे.<br>६. चित्रपटगीताचे काव्यमूल्य व मनोरंजनमूल्य समजून घेणे. | |
| 8 | **Course Outcomes**: परिणाम / निष्पत्ती<br>१. चित्रपटगीत या सामाजिक - सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या कलाप्रकाराच्या स्वरूपाची माहिती होईल.<br>२. चित्रपटगीताच्या मराठी परंपरेचा व एकूणच मराठी गीतपरंपरेचा परिचय होईल.<br>३. चित्रपटगीतांच्या विविध प्रकारांची माहिती होईल.<br>४. चित्रपटगीतांच्या सांगीतिक, चित्रपटकथासंबंधित अंगाचा परिचय होईल.<br>५. चित्रपटगीतांची व्यावसायिक बाजू समजून घेण्याची क्षमता विकसित होईल.<br>६. चित्रपटगीताचे काव्यमूल्य, कलामूल्य तसेच मनोरंजनमूल्य यांची चर्चा करण्याची क्षमता विकसित होईल. | |

| | |
|---|---|
| 9 | **Modules**:- Per credit One module can be created |
| | **Module 1: घटक १ : चित्रपटगीत : संकल्पना - स्वरूप व वैशिष्ट्ये - परिचय** (१५ व्याख्याने - १ श्रेयांकन) |
| | १. चित्रपटगीत - संकल्पना<br>२. चित्रपटगीत - आधुनिक काव्यप्रकार<br>३. मराठी गीतपरंपरा<br>४. चित्रपटगीतांचे विविध उपप्रकार - परिचय<br>५. गीताची भाषिक वैशिष्ट्ये - वृत्त, छंद इत्यादी |
| | **Module 2:**<br>**घटक २ : चित्रपटगीत : स्वरूप व वैशिष्ट्ये - प्रत्यक्ष उपयोजनाच्या आधारे चर्चा** (१५ व्याख्याने - १ श्रेयांकन) |

| | |
|---|---|
| | १. चित्रपटगीताच्या मुख्य दोन बाजू - सांगीतिक व चित्रपटकथासंबंधित - परस्परसंबंध<br>२. चित्रपटगीताला असणारे व्यावसायिक संदर्भ<br>३. चित्रपटगीताचे काव्यमूल्य व मनोरंजनमूल्य<br>४. काही नेमलेली चित्रपटगीते - ( यापैकी प्रत्येक गीतकाराचे कोणतेही एक गीत )<br>i) मन शुद्ध तुझं / आधी बीज एकले - शांताराम आठवले<br>ii) फड सांभाळ तुऱ्याला गं / बुगडी माझी सांडली गं - ग.दि. माडगूळकर<br>iii) गोड गोजिरी / जिथे सागरा धरणी मिळते - पी. सावळाराम<br>iv) आकाशी झेप घे रे / राजा ललकारी - जगदीश खेबूडकर<br>v) शूर आम्ही सरदार / पप्पा सांगा कोणाचे - शांता शेळके<br>vi) आम्ही ठाकर ठाकर / चिंब पावसानं रान झालं आबादानी - ना.धो. महानोर<br>vii) गोमू संगतीनं / आला आला वारा - सुधीर मोघे<br>viii) प्रथम तुला वंदितो / ही पोरगी पटली - शान्ताराम नांदगावकर<br>ix) मन उधाण वाऱ्याचे / खेळ मांडला - गुरू ठाकूर |
| **10** | **Text Books: NA** |
| | **Reference Books:**<br><br>स्रोत ग्रंथ : गीतकारांचे गीतसंग्रह व काही चरित्रग्रंथ -<br>१. शेळके, शांता, *तोच चंद्रमा नभात*, सुरेश एजन्सी.<br>२. शेळके, शांता, *कळ्यांचे दिवस फुलांच्या राती*, सुरेश एजन्सी.<br>३. शब्दांकन - माडगूळकर, ग. दि., सी.रामचंद्र, *माझ्या जीवनाची सरगम*, इनामदार बंधू प्रकाशन, १९७७<br>४. माडगूळकर, ग.दि. *चैत्रबन*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.<br><br>संदर्भ ग्रंथ :<br>१. मोघे,सुधीर, *मराठी भावसंगीत कोश*, अनुबंध प्रकाशन, पुणे.<br>२. भोळे, केशवराव, *माझे संगीत*, मौज प्रकाशन गृह, मुंबई.<br>३. भोळे, केशवराव, *अस्ताई* , मौज प्रकाशन गृह, मुंबई.<br>४. भोळे, केशवराव, *अंतरा*, मौज प्रकाशन गृह, मुंबई.<br>५. रसाळ, सुधीर, *कविता आणि प्रतिमा*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, प.आ. १९८२.<br>६. तेंडुलकर, रमेश, *गीतभान*, विश्वमोहिनी, पुणे, १९८२.<br>७. मोहोळकर, माधव, *गीतयात्री*, मौज प्रकाशन, १९८७.<br>८. मिश्र, अंबरीश, *शुभ्र काही जीवघेणे*, राजहंस प्रकाशन, पुणे.<br>९. गोडबोले, अच्युत व पिशवीकर,सुलभा, *नादवेध*, राजहंस प्रकाशन, पुणे.<br>१०. भट, सुरेश, *रंग माझा वेगळा*, यातील लता मंगेशकर यांची प्रस्तावना, विजय प्रकाशन, नागपूर.<br>११. जोशी, ना.ग., *मराठी छंदोरचनेचा विकास*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९६४.<br>१२. जोशी, ना.ग., *तुलनात्मक छंदोरचना*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९६८.<br>१३. संपा. राजाध्यक्ष, विजया, *मराठी वाङ्मयकोश*, समीक्षा - संज्ञा - खंड चौथा,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२. |

| | |
|---|---|
| | १४. कुळकर्णी, वा.ल, *मराठी कविता : जुनी आणि नवी*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८०.<br>१५. पाटणकर, वसंत, *कवितेचा शोध*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०११.<br>१६. केळकर, अशोक , *वैखरी*, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८३.<br>१७. भागवत, श्री. पु.; रसाळ, सुधीर; पाडगावकर, मंगेश; तेंडुलकर, शिल्पा; कीर्तने, अंजली,संपा., *साहित्य : अध्यापन आणि प्रकार*, पॉप्युलर व मौज प्रकाशन, मुंबई, १९८७.<br>१८. थोरात, हरिश्चंद्र, *मूल्यभानाची सामग्री*, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१६.<br>१९. पोतदार, मधू, *जनकवी पी. सावळाराम*, उद्वेली प्रकाशन, २०१५.<br>२०. मोघे, सुधीर, *गाणारी वाट*, मिनाका प्रकाशन, २००९.<br>२१. आठवले, शांताराम, *प्रभातकाल*, व्हीनस प्रकाशन, पुणे.<br>२२. शेळके, शांता, *चित्रगीते*, बुकहंगामा (सृजन ड्रीम्स प्रा. लि.), २०२०.<br>२३. रसाळ, सुधीर, *कविता आणि प्रतिमा*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८२. |

| | | |
|---|---|---|
| 12 | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination 60% Individual Passing in Internal and External Examination** |
| 13 | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc( at least 3 ) | चाचणी परीक्षा / प्रकल्प / सादरीकरण / ऑनलाईन - २० गुण |
| 14 | **Format of Question Paper:** for the final examination<br>प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पुढीलप्रमाणे -<br>प्र. १ - घटक क्र. १ वर आधारित अंतर्गत पर्याय असलेले एकूण दोन प्रश्न विचारावेत, त्यापैकी १ सोडविणे = एकूण १० गुण<br>प्र. २ - घटक क्र. २ वर आधारित अंतर्गत पर्याय असलेले एकूण दोन प्रश्न विचारावेत, त्यापैकी १ सोडविणे = एकूण १० गुण<br>प्र. ३ - घटक क्र. १ व २ वर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न - प्रत्येक घटकावर पाच असे एकूण दहा वस्तुनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न - परीक्षार्थींनी यातील कोणतेही ५ प्रश्न सोडवावेत. प्रत्येक योग्य उत्तरास २ असे = एकूण १० गुण | |

Sign of the BOS Chairman
Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**
Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean
Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**
Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean
Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**
Name of the Faculty**:** **Humanities**